लोकसत्ता पु.पा.१५३.

# ‘बटेंगे तो कटेंगे’, ‘एक हैं तो सेफ हैं’

## योगी आदित्यनाथ यांच्याकडून घोषणेचा पुनरुच्चार

**लोकसत्ता वार्ताहर**

**भाईंदर :** ‘कटेंगे तो बटेंगे’ अशी घोषणा देऊन देशभर खळबळ उडवून देणाऱ्या उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी मिरा रोड येथे या घोषणेचा पुनरुच्चार केला. या वेळी सभेतील उपस्थितांनी जय श्रीरामच्या घोषणा देत परिसर दणाणून सोडला.

मिरा-भाईंदर आणि ओवळा-माजिवडा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार नरेंद्र मेहता आणि प्रताप सरनाईक यांच्या प्रचारासाठी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री



योगी आदित्यनाथ यांची जाहीर सभा बुधवारी मिरा रोडच्या सेंट्रल पार्क मैदानात आयोजित **(पान ३ वर)**

### घोषणेचे टी-शर्ट

योगी आदित्यनाथ पहिल्यांदाच मिरा-भाईंदर शहरात आल्यामुळे त्यांना पाहण्यासाठी भाजप कार्यकर्त्यांनी तसेच नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. अनेकांनी ‘बटेंगे तो कटेंगे’ असे वाक्य लावलेले टी-शर्ट घातले होते आणि फलक हातात घेतले होते. योगी व्यासपीठावर येताच सर्वांकडून जय श्रीरामची घोषणाबाजी करण्यात आली. सभेसाठी उत्तर भारतीय नागरिकांची संख्या सर्वाधिक होती.

### टिपू सुलतान चौकाचे नाव बदलण्याचे आश्वासन

मिरा रोड येथील नया नगरमध्ये एका चौकाचे ‘हजरत टिपू सुलतान चौक’ असे नामकरण करण्यात आले होते. याबाबतचे नामफलक स्थानिक नगरसेवक नरेश पाटील यांच्या निधीतून लावण्यात आले होते. जिंकून येताच या चौकाचे नाव बदलणार असल्याचे आश्वासन भाजप उमेदवार नरेंद्र मेहता यांनी दिले आहे.

# ‘बटेंगे तो कटेंगे, एक हैं तो सेफ हैं’

**(पान १ वरून)** करण्यात आली होती. या सभेत हजारोंच्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

‘बटेंगे तो कटेंगे’ ‘एक हैं तो सेफ हैं’ या प्रसिद्ध झालेल्या वाक्याचा पुनरुच्चार करीत योगी आदित्यनाथ यांनी विरोधकांवर टीकास्त्र सोडले. योगी यांनी घोषणा देताच, उपस्थित नागरिकांनी एकच जल्लोष केला. देशात सर्वाधिक काळासाठी काँग्रेसने शासन केले आहे. मात्र विकासकामे करण्याऐवजी त्यांनी देशाला लुटले आहे. २०१४ पूर्वी भारत हा दुर्बल अवस्थेत होता. मात्र नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वामध्ये देशात सुरक्षितता आणि विकासाचे वातावरण पसरले असल्याचे योगी म्हणाले. आगामी निवडणूक ही अस्मिता व अस्तित्व टिकवण्याची आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मागे समर्थपणे उभे राहण्याचे आवाहन त्यांनी केले. काँग्रेसने विकासकामे तर सोडा किमान राम मंदिर तरी उभारायला पाहिजे होते, असेही ते म्हणाले. या वेळी माजी मंत्री कृपाशंकर सिंह, शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाचे भाजप जिल्हाध्यक्ष किशोर शर्मा, राजू भोईर आदी उपस्थित होते.

**नालासोपाऱ्यातील सभा रद्द**

नालासोपारा मतदार संघातील उत्तर भारतीयांची मनधरणी करण्यासाठी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ प्रचारासाठी येणार असल्याची चर्चा होती. मात्र ऐनवेळी त्यांची सभा रद्द करण्यात आल्याने भाजप कार्यकर्ते नाराज झाले आहेत.

Scanned with OKEN Scanner

लोकमत पु.पा.७.

गुन्हा दाखल होणार : पोलिसांचे आवाहन

# तेढ निर्माण करणारे संदेश शेअर कराल, तर खबरदार!

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आदर्श आचारसंहितेचे आणि कायदे नियमांचे उल्लंघन समाजमाध्यमांवर उघड-उघड सुरू असल्याने त्यातून तक्रारी होऊन गुन्हे दाखल केले जात आहेत. परंतु मीरा भाईंदर-वसई विरार पोलिस आयुक्तालयाने आता समाजमाध्यमे वापरणाऱ्या सर्व खातेधारकांना जाहीर नोटीस बजावून तेढ निर्माण करणाऱ्या आक्षेपार्ह पोस्ट केल्यास गुन्हा दाखल करण्याचा इशारा दिला आहे.

यंदाची निवडणूक ही मुख्यत्वे धार्मिक मुद्द्यांवरच चालली असून सोशल मीडियापासून प्रचार सभांमधूनही धार्मिक मुद्दे काढले जात आहेत. त्यातही विशिष्ट धर्मियांना आणि त्या अनुषंगाने विशिष्ट पक्षांना टार्गेट केले जात आहे. त्यासाठी बनावट खोट्या पोस्ट, बनावट पत्र, मॉर्फ फोटो - व्हिडीओपासून खोट्या संदेशांचा वापर केला जात आहे. त्यातून तक्रारी, गुन्हे दाखल होणे सुरूच असले तरी अशा तेढ निर्माण करणाऱ्या प्रचारामुळे जागरूक व समजूतदार नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे.

या प्रकरणाची पोलिस आयुक्त मधुकर पांडेय व अपर पोलिस आयुक्त दत्तात्रय शिंदे यांनी दखल घेत प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार सायबर पोलिस ठाण्याचे निरीक्षक सुजितकुमार गुंजकर यांनी नोटीस जारी केली आहे.



■ सोशल मीडियामध्ये सामाजिक, जाती, धार्मिक तेढ निर्माण करणारे आक्षेपार्ह पोस्ट-मेसेज व्हायरल होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊन सार्वजनिक शांततेस बाधा आल्यास अथवा तशी परिस्थिती निर्माण झाल्यास किंवा आदर्श आचारसंहितेचा भंग झाल्यास कायद्यातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल, असे गुंजकर यांनी स्पष्ट केले आहे.

## आदर्श आचारसंहितेचा भंग झाल्यास होणार कारवाई

आदर्श आचारसंहिता लागू असून फेसबुक, व्हॉट्सअॅप, इंस्टाग्राम, यूट्युब, टेलिग्राम, एक्स आदी सोशल मीडियाच्या माध्यमातून राजकीय, सामाजिक, जातीय, धार्मिक विषयांवरून तेढ निर्माण करणाऱ्या पोस्ट व्हायरल होत आहेत. सोशल मीडिया वापरत असलेल्या कोणत्याही नागरिक, ग्रुप अॅडमिनमार्फत चर्चेमधून किंवा इतर कोणत्याही माध्यमाद्वारे दोन गटांमध्ये सामाजिक, जातीय, धार्मिक तेढ निर्माण करणारे आक्षेपार्ह संदेश तयार करून फॉरवर्ड करणे, सामाजिक स्वास्थ्य बिघडेल असे कृत्य करणे, प्रत्यक्ष धर्म, जात, पंथ याबाबत प्रक्षोभक वक्तव्य करणे इत्यादी कारणांमुळे कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल अथवा आदर्श आचारसंहितेचा भंग होईल, असे कृत्य करीत असल्यास आपणास वैयक्तिकरीत्या जबाबदार धरण्यात येईल, असा इशारा पोलिसांनी दिला आहे.

# महिलेची फसवणूक

**नालासोपारा :** विरारच्या डोंगरपाड्यातील कुंभारवाडा येथे राहणाऱ्या अनुसया पाटील (६२) यांची १ जानेवारी २०१४ ते ३१ मार्च २०२३ दरम्यान फ्लॅटच्या नावावर लाखोंची फसवणूक केली आहे. अमित मोहिते आणि विवेक नर या दोघांनी त्यांना फ्लॅट दाखवून त्याकरिता सेल अॅग्रिमेंट बनवले. दोघांनी त्यांच्याकडून वेळोवेळी चेकद्वारे ११ लाख ७० हजार रुपये घेऊन त्यांना फ्लॅट न देता अगर त्यांचे पैसे परत न देता त्यांच्या पैशाचा अपहार करून फसवणूक केली आहे. नालासोपारा पोलिसांनी मंगळवारी गुन्हा दाखल केला असून अधिक तपास सुरू आहे.

# हद्दपार आदेश उल्लंघन; वसईत गुन्हा दाखल

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** हद्दपारीच्या आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी वसई येथे एका आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वसईत राहणाऱ्या रफिक शेख (वय ४१) याला दोन वर्षांकरिता हद्दपार केलेले असतानाही आदेशाचा भंग करून कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता मंगळवारी रात्री वसईच्या पाचूबंदर परिसरात आरोपी दिसून आला. आरोपीविरोधात पोलिस अंमलदार बाळू गर्जे (३०) यांनी वसई पोलिस ठाण्यात तक्रार देऊन महाराष्ट्र पोलिस अधिनियम कलमाखाली हद्दपारीच्या आदेशाचा भंग केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

# पोलिसांनी गांजा पकडला



**नालासोपारा :** तुळींजच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी मंगळवारी दुपारी गांजा पकडला आहे. पोलिसांनी दीड वाजण्याच्या सुमारास तुळींज स्मशानभूमीजवळ नवाज खान (१९) या संशयित आरोपीला पकडले. त्याची झडती घेतल्यावर त्याच्याकडे ३६ हजार ४२० रुपयांचा २ किलो ४२८ ग्रॅम गांजा बेकायदेशीर विक्रीसाठी बाळगलेला मिळून आला आहे. अशपाक जमादार (३४) याने तक्रार देऊन गुन्हा दाखल केल्यावर गांजा जप्त करून आरोपीला अटक केली आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

Scanned with OKEN Scanner

लोकमत ८.५.१.

# भरणी माफिया उठवत आहेत आचारसंहितेचा फायदा

## महापालिका, पोलिस अन् महसूल विभागाचे दुर्लक्ष

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** निवडणुकीचे काम असल्याचे कारण पोलिस, महापालिका व महसूल प्रशासन पुढे करत स्वतःचे कर्तव्य मात्र जाणीवपूर्वक टाळत आहे. जेणेकरून प्रशासनाच्या आशीर्वादाने निवडणूक काळात भरणी माफिया मोकाट झाले आहेत.

मीरा-भाईंदरमध्ये भरणी माफियांना राजकारण्यांसह पोलिस, पालिका व महसूल, तसेच वन विभाग प्रशासनाचा आशीर्वाद असल्याचे लपून राहिलेले नाही, असा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे. भरणी माफियांच्या बेकायदा डेब्रिज आणि माती-गाळाच्या भरणीमधून लाखो रुपयांची उलाढाल होतेच, शिवाय भूखंड तयार करून दिले जातात. त्यामुळे शहरात राजरोस बेकायदा डेब्रिज-मातीची वाहतूक करणाऱ्या वाहनांना सर्वच प्रशासनाचा वरदहस्त राहिला आहे. शिवाय अगदी रस्ता, खाडी, नाला, कांदळवन क्षेत्र, सीआरझेड, इकोसेन्सेटिव्ह क्षेत्र आदी प्रतिबंधात्मक क्षेत्रात सर्रास भरणी केली जात आहे.



जाफरी खाडी क्षेत्र, वसई खाडी किनारा, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानालगतच्या भागात माफियांकडून भरणी सुरू आहे.

### जागरुक नागरिकांच्या तक्रारींवर कारवाई नाही

■ याबाबत जागरुक नागरिकांनी अनेकदा तक्रारी दिल्या असून गुन्हा दाखल करून बेकायदा भरणी थांबवण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे; परंतु तरीही शहरात निवडणूक काळात भरणी सुरुच आहे. पालिका व पोलिस महसूल विभागाकडे बोट दाखवून स्वतःची जबाबदारी टाळत आहेत, तर महसूल विभागाकडून पालिका व पोलिस यांचीही जबाबदारी असल्याचे बोलले जाते.

■ पेणकरपाडा येथील कांदळवन क्षेत्रात मीरा-भाईंदर महापालिकेनेच ठेकेदारास सांगून भरणी करायला लावली व त्याचे सपाटीकरण केले. चेणे येथे कांदळवन क्षेत्रात सातत्याने तक्रारी होऊनही पोलिस, पालिका व महसूल विभागाच्या संगनमताने भरणी सुरू असून, कांदळवन नष्ट होत आहे. मीरा रोड पश्चिम, भाईंदर पश्चिम भागात भरणी माफिया कार्यरत आहेत. जाफरी खाडी क्षेत्र, वसई खाडी किनारा, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानालगतच्या भागात भरणी माफियांनी भरणी चालवली आहे.



वसई तालुक्यात भूमाफिया, मातीचोर व बेकायदा बांधकामधारक मोठ्या प्रमाणात सक्रिय झाले असून माती भराव केला जात आहे.

# वसईतही माती भराव

## लाखोंचा महसूल बुडवल्याचा आरोप

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता सुरू असल्यामुळे विविध शासकीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी निवडणूक प्रक्रियेत व्यस्त आहेत. याचा गैरफायदा घेऊन तालुक्यात भूमाफिया, मातीचोर व बेकायदा बांधकामधारक मोठ्या प्रमाणात सक्रिय झाले आहेत. याची प्रचिती गिरीज येथील एका माती भरावप्रकरणी आली आहे.

वसईतील गिरीज - भडाळेपाडा येथे मोठ्या प्रमाणात बेकायदेशीररीत्या माती भराव करण्यात आला. या माती भरावाची रॉयल्टी न भरता शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडवून माती भराव केल्याचे निष्पन्न होत आहे. याबाबत महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, जिल्हाधिकारी पालघर, उपविभागीय अधिकारी वसई व तहसीलदार कार्यालयास तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत.

### निवडणूक प्रक्रियेचा घेतला जातोय गैरफायदा

■ मागील काही दिवसात निवडणूक प्रक्रियेचा गैरफायदा घेत तिवरांच्या झाडांची कत्तल करणे, बेकायदेशीर माती भराव करून त्यावर अनधिकृत बांधकामे उभी करण्याचा सपाटा सुरू आहे. या ठिकाणी एका निवासी संकुलाला तत्काळ पाणी जोडणी देण्यावरून स्थानिकांनी काही महिन्यांपूर्वी आक्षेप घेत हे काम बंद पडले होते.

■ याच संकुलाला सोयीस्कररीत्या माती भराव करून सहकार्य केले जात असल्याचा स्थानिकांचा आरोप आहे. हा परिसर सखल असल्यामुळे या भागात पावसाळ्यात पाणी निचऱ्याचा प्रश्न निर्माण होणार आहे. याबाबत तहसीलदार अविनाश कोष्टी यांना संबंधितांनी तक्रारीसह पुरावे सादर केले असून, त्यांनी कारवाईचे आश्वासन दिले आहे.

# एमडी अमली पदार्थ पकडला

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** पेल्हार पोलिसांनी सोमवारी रात्री गस्तीदरम्यान दोन आरोपींसह एमडी अमली पदार्थ पकडला आहे.


सोमवारी रात्री आठच्या सुमारास पेल्हार गावच्या ब्रीज जवळील सर्व्हिस रोडवर आरोपी अनस खान (२०) आणि सुफियान गुर्जर (२२) या दोघांकडे १ लाख २० हजार रुपयांचा ६० ग्रॅम वजनाचा एमडी अमली पदार्थ विक्रीसाठी बाळगला असताना मिळून आला. पोलिस अंमलदार शरद राठोड (२८) यांनी पेल्हार पोलिस ठाण्यात तक्रार देऊन गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक करून अमली पदार्थासह दीड लाखांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

# वसईत अनधिकृत बांधकामांवर कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** वसई-विरार महापालिका आयुक्त अनिलकुमार पवार आणि अतिरिक्त आयुक्त रमेश मनाळे यांच्या आदेशानुसार तसेच अतिक्रमण विभागाचे उपायुक्त अजित मुठे यांच्या नेतृत्वाखाली मंगळवारी प्रभाग समिती 'एफ' पेल्हार अंतर्गत अनधिकृत बांधकामावर निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे.

या मोहिमेत सीयूसी विभागाचे कनिष्ठ अभियंता विवेक गुदुकडे, जितेश पाटील, प्रभाग डी व विशेष नियोजनाचे कर्मचारी व एमएसएफ कर्मचारी उपस्थित होते.



प्रभाग समिती (एफ) अंतर्गत मायकल कंपाऊंड येथे १२ हजार फुटांचा एक गाळा व जाबरपाडा येथील १५ रुमचे बांधकाम निष्कासित करण्यात आले.

Scanned with OKEN Scanner

पुढारी पु.पा.२.

# वसई-विरार शहरात पादचारी रस्त्यांवर अतिक्रमण?

## वाहन विक्री व्यावसायिकांचे रस्त्यावरच बस्तान

**विरार : पुढारी वृत्तसेवा**

वसई-विरार शहरातील रस्ते रुंदीकरण, सुशोभीकरण करण्याच्या कामाला पालिकेने सुरुवात केली आहे. मात्र याच रस्त्याचा फुथपाटवर खाजगी वाहन विक्री करणाऱ्या मालकांनी डल्ला मारला असल्याचे दिसून आले आहे. यामुळे रस्त्याच्या विद्रूपीकरणात भर पडत असून त्यामुळे परिसरात वाहतूक कोंडीचीही समस्याही उद्भवत आहे. त्यामुळे खाजगी वाहनविक्री करणाऱ्या या सर्व मालकांवर पालिकेने कारवाई करून फुथपाट मोकळे करावे अशी मागणी जोर धरू लागली आहे.

वसई -विरार शहरातील वर्दळीच्या रस्त्यांवर फेरीवाल्यांनी आपले बस्तान मांडले आहे. तर याच रस्त्याच्या फुटपाथ वर चारचाकी वाहने विक्री करणाऱ्या मालकांनी डल्ला मारला आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिकांची कोंडी झाली आहे. सकाळच्या वेळेस या फुटपाथ वरून ज्येष्ट नागरिक प्रभातफेरी मारत असतात मात्र अतिक्रमण झाल्यामुळे नागरिकांना जागा उरली नाही आहे. अतिक्रमण केलेल्या मालकांवर पालिकेने कारवाई करावी असे मत नागरिकांनी पुढारी शी बोलताना व्यक्त केले आहे.

वसई विरार शहरात अवैध बांधकामांचा सुळसुळाट चालू असताना विरार पश्चिमेकडील रस्त्यावर मोठ्या प्रमाणात चारचाकी वाहने विक्री करण्याचे दुकाने उभी राहिली आहेत. मात्र या दुकानदारांनी थेट पालिकेच्या रस्त्याच्या फुटपाथवर डल्ला मारण्यास सुरुवात केली आहे. अनेक दुकानदारांनी ग्राहकांचे लक्ष आपल्या दुकानाकडे आकर्षक व्हावे यासाठी थेट फुटपाथवर मोठ मोठे विद्युत संच लावले आहेत तर काहींनी त्या फुटपाथवर सिमेंट कॉंक्रिट करून गुळगुळीत करून घेतले आहेत अशा मालकांच्या दुकानावर कारवाई करावी अशी मागणी नागरिकांमधून जोर धरू लागली आहे.

### अतिक्रमण केलेली ठिकाणे

विरार पूर्व मनवेल पाडा, विरार पश्चिम ग्लोबल सिटी रोड, नालासोपारा पूर्व आचोले रोड, वसई सनसिटी, वसई पश्चिम नाईटी फिट रोड.

पुढारी पु.पा.३.

# निवडणूक काळात सोशल मीडियाचा योग्य वापर करा

## पोलिसांचे नागरिकांना आवाहन

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाकडून शहरातील सर्व नागरीकांना निवडणुकीच्या काळात सोशल मिडीयाचा योग्य वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. लोकसभा पोटनिवडणुक २०२४ व विधानसभा सार्वत्रिक निवडणुक अनुषंगाने १५ ऑक्टोबर ते २५ नोव्हेंबर २०२४ पर्यंत आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील जिल्हयासह संपूर्ण महाराष्ट्र सार्वत्रिक निवडणुकीचे मतदान २० नोव्हेंबर २०२४ रोजी व निकाल २३ नोव्हेंबर रोजी जाहिर होणार आहे. त्यामुळे कोणीही नागरीक सोशल मिडीयाद्वारे फेसबुक, इंस्ट्राग्राम, यु ट्यूब चैनल, ट्विटर , एक्स खाते, व्हॉटसअप ग्रुप व इतर तत्सम एप्लीकेशनच्या माध्यमाद्वारे कोणत्याही व्यक्तीच्या, वंशाच्या, समाजाच्या, जातीच्या, धर्माच्या व वर्णाच्या भावना दुखावतील अशा स्वरुपाच्या पोस्ट, कॉमेंटस्, स्टोरी स्टेटस, डिजीटल बॅनर असे प्रकार समाज माध्यामाद्वारे प्रसारीत करु नयेत.तसेच कोणाचेही विरोधात घोषणावाजी करु नये, डिजे वाजवणार नाहीत, फटाके फोडणार नाही, रंग गुलाल उधळणार नाही. संबंधीत विभागातून पुर्व परवानगी शिवाय कोणतेही राजकीय कार्यक्रम करू नयेत. व्हॉटसप ग्रुपचे डमीन यांनी २५ नोव्हेंबर २०२४ या कालावधीमध्ये त्यांच्या ग्रुपच्या बेटींगमध्ये ओनली डमीन करुन बदल करुन घ्यावा, जेणेकरुन ग्रुपमधील कोणताही सदस्य वादग्रस्त पोस्ट ग्रुपवर टाकणार नाहीत. जर डमीन यांनी सेटिंगमध्ये बदल केला नाही व कोणी सदस्यांनी वादग्रस्त पोस्ट टाकल्याने काही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास पोस्ट करणाऱ्या सदस्याला व डमीनला जबावदार धरुन योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

पुढारी पु.पा.७.

## मद्यपान करून महिलेचा पोलीस ठाण्यात धिंगाणा

**विरार :** विरार पूर्व गास कोपरी परिसरात एका महिलेने मद्यपान करून पोलीस ठाण्यात धिंगाणा केल्याचा प्रकार समोर आला आहे. ही २९ वर्षीय महिला सोमवारी सकाळी मद्यपान करून पोलीस स्टेशनमध्ये पोहोचली. दारू पिऊन तिने आपल्या दोन्ही मुलींचा गळा दाबण्याचा प्रयत्न केला होता. पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवण्यासाठी तिच्या दोन्ही मुली देखील पोहोचल्या होत्या. महिला पोलिसांनी अनेक वेळा समजावले तरी मद्यमान केलेल्या महिलेने कोणाचेही न ऐकता पोलीस ठाण्यात मोठ्या प्रमाणात धिंगाणा घातला. त्याचबरोबर महिला पोलीस कर्मचारी व पुरुष पोलीस कर्मचारी यांना धक्का देत पोलीस ठाण्यात शिव्या गाळ देखील केली. यासंदर्भात विरार पोलीस ठाण्यात महिलेविरुद्ध विविध कलम अंतर्गत गुन्हा दाखल केला असून महिलेला सध्या नोटीस देऊन सोडण्यात आले आहे.

## नालासोपारात एकाची आत्महत्या

**विरार :** नालासोपारा पूर्व धानिव बाग परिसरात एका व्यक्तीने स्वतःच्या राहत्या घरी आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे.

धानिव परिसरात राहणारे धनकुमार पाल (४०) हे अनेक वर्षापासून भीसीमध्ये पैसे लावत होते. डीसीमध्ये लावलेल्या पैशांमधून त्यांचा नंबर आल्यावर त्यांनी भीसीमधले पैसे उचलले. आर्थिक परिस्थिती नसल्याने त्यांना भीसीचे पैसे परत करता येत नव्हते, त्यामुळे भीसी चालवणारे त्यांना वारंवार फोन करून धमकावत होते. त्याच निराशातून त्यांनी गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. या घटने संदर्भात नालासोपारा पोलीस पुढील तपास करत आहे.

Scanned with OKEN Scanner

पुण्यनगरी पा.नं. IV

# खंडित पाणीपुरवठ्यामुळे मीरा-भाईंदरमध्ये पाणीटंचाई

## नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना | निवडणुकीवर परिणाम होण्याची शक्यता

**। मीरा रोड :** मीरा-भाईंदर शहरात गेल्या काही महिन्यांपासून वारंवार पाणीपुरवठा खंडित होतो. यामुळे शहरात पाणीटंचाई निर्माण होत असून, ऐन निवडणुकीत शहरात पाणीटंचाई निर्माण होत असल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

मीरा-भाईंदर महापालिकेस महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून १२५ द.ल.लि. प्रतिदिन व स्टेम प्राधिकरणाकडून ८५ द.ल.लि. प्रतिदिन, तसेच बृहन्मुंबई महापालिकेकडून १.५ द.ल.लि प्रतिदिन असा एकूण २११.५ द.ल.लि. प्रतिदिन पाण्याचा कोटा मंजूर आहे. परंतु प्रत्यक्षात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून जवळपास सरासरी ११७ द.ल.लि. प्रतिदिन स्टेम प्राधिकरणाकडून ७५ द.ल.लि. प्रतिदिन व बृहन्मुंबई महापालिकेकडून ०.५ द.ल.लि. प्रतिदिन असा सरासरी १९२.५ द.ल.लि. प्रतिदिन पाणीपुरवठा होत आहे.

**◆ पाणीपुरवठा करणाऱ्या संस्थेकडून तांत्रिक कारणास्तव पाणीपुरवठा बंद होत असतो. तो पूर्वपदावर येण्यासाठी जवळपास ४८ तासांचा कालावधी लागतो. कारण मीरा-भाईंदर शहर हे पाण्याच्या स्त्रोतापासून सुमारे ५० किमी दूर, तसेच पाणीपुरवठा योजनेच्या शेवटच्या टोकाला आहे.**

मीरा-भाईंदर शहराची दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढत आहे. सध्याच्या लोकसंख्येनुसार, शहराला २३५ द.ल.लि. प्रतिदिन पाण्याची गरज आहे. प्रत्यक्षात १९२.५ द.ल.लि.च पाणीपुरवठा होत असल्याने शहराची पाण्याची मागणी व पुरवठा यात तफावत असल्याने नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. यामध्ये मीरा-भाईंदर शहराला पाणीपुरवठा करणारी पाइप लाइन नेहमीच कुठे ना कुठे फुटते किंवा साफसफाईसाठी, वीज नसेल त्या वेळी पाणीपुरवठा खंडित होतो. खंडित झाल्यानंतर पाणी वाढून देणे आवश्यक असताना पाणी वाढून न देता प्रतिदिन देण्यात येणारे पाणीच दिले जाते. याबाबत महापालिका अधिकारी व खासदार, आमदार बोलताना दिसत नाही.

पाणीपुरवठा करणाऱ्या दोन्ही संस्थांचा शटडाऊन सलगच्या आठवड्यात काही अपरिहार्य कारणास्तव घ्यावा लागल्यास अशा परिस्थितीत पाणीपुरवठा सुरळीत होण्यासाठी लक्षणीय कालावधी म्हणजेच सुमारे तीन ते चार दिवसांचा कालावधी लागतो. दिवाळीचा सण व विधानसभा निवडणुका सुरू आहेत. त्यामुळे शटडाऊन घेतला जात नसला तरी शहरात पाणीपुरवठा करणारी पाइप लाइन फुटत असल्यामुळे पाणीपुरवठा कमी होत आहे. त्यामुळे नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे.

दोन दिवसांपूर्वी एमआयडीसीच्या मुख्य जलवाहिनीवर निळजे गाव येथे अचानक मोठ्या प्रमाणात गळती झाल्याकारणाने तत्काळ दुरुस्ती कामासाठी शहराचा पाणीपुरवठा बंद करण्यात आला. नंतर सुमारे २९ तासांनंतर पाणीपुरवठा सुरू करण्यात आला. पाणीपुरवठा बंद असल्यामुळे शहरातील नागरिकांना पाण्यासाठी त्रास सहन करावा लागला. या वेळी टँकरवाले जास्त दर आकारतात, पैसै देऊनही योग्य दर्जाचे पाणी मिळत नाही. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याच्याही समस्या निर्माण होत आहेत.

पुण्यनगरी पु.पा. ४.

# बोळिंजमध्ये पथदर्शक पाट्या मराठीत

## ▌एकीकरण समितीच्या दणक्यामुळे महापालिकेला जाग

**। वसई :** इंग्रजीत लावलेल्या पाट्या मराठीत करण्याचा दणका मराठी एकीकरण समितीने दिल्यामुळे भानावर आलेल्या महापालिकेला बोळिंज येथील पथदर्शक पाट्या मराठीत कराव्या लागल्या.

महापालिकेने विरार पश्चिमेकडील बोळींज नाक्याच्या अर्नाळा पोलीस चौकीजवळ इंग्रजी भाषेत फलक लावला होता. ही बाब निदर्शनास आल्यावर मराठी एकीकरण समितीने पालिकेला लेखी इशारा देत मराठीत पथदर्शक पाट्या लावण्याच्या सूचना केल्या होत्या. महाराष्ट्र राजभाषा अधिनियम आणि शासनाच्या ईप्रशासन धोरणानुसार महाराष्ट्राची अधिकृत राजभाषा







मराठीतच हवी. शासन व्यवहारात १०० टक्के मराठी वापरण्याच्या तरतुदी शासनाने वेळोवेळी केलेल्या आहेत. या धोरणाला बगल देत आणि महाराष्ट्र राजभाषा अधिनियमांचा विपर्यास करून बोळींज नाक्यावर जाणीवपूर्वक इंग्रजी फलक लावण्याचा प्रकार गंभीर असून, कलम ३५१ नुसार गुन्हा आहे. तसेच भाषिक वाद निर्माण करणारा आहे. या प्रकाराकडे संबंधित अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्यास १५३ अ अंतर्गत गुन्हा नोंदवावा लागेल, असा इशारा मराठी एकीकरण समितीचे सागर पाटील यांनी महापालिकेला दिला होता. त्याची गंभीर दखल घेत पालिकेने बोळींज येथील पथदर्शक इंग्रजी पाट्या तात्काळ बदलून मराठीत केल्या. यापुढेही मराठी व्यतिरिक्त इतर भाषेचा वापर कटाक्षाने टाळावा, अन्यथा कोणतीही पूर्वसूचना न देता नियमांप्रमाणे कारवाई केली जाईल, अशा इशारा मराठी एकीकरण समितीने पालिकेला दिला आहे.

Scanned with OKEN Scanner

पुण्यनगरी पृ.पा.७.

# काँग्रेस उमेदवाराचे होर्डिंग फाडले

## विरोधकांवर आरोप, गुन्हा दाखल

**। वसई** : वसई विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीच्या उमेदवाराचे होर्डिंग फाडण्यात आल्याची घटना घडली असून, याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वसई मतदारसंघात सत्ताधारी बहुजन विकास आघाडी, महायुती आणि महाविकास आघाडी अशी प्रामुख्याने तिरंगी लढत होत आहे. या लढतीसाठी महाविकास आघाडीच्या काँग्रेसमधील उमेदवाराचे होर्डिंग गास गावात लावलेले होते. रात्री हे होर्डिंग फाडण्यात आले. त्यामुळे येथील वातावरण काही काळ तंग होते. या घटनेमागे विरोधकांचा हात असल्याचा आरोप काँग्रेसने केला असून, नालासोपारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



### नेमके काय घडले?

महाविकास आघाडीने गास गावात प्रचाराचे होर्डिंग लावले होते. रात्री अज्ञात व्यक्तींनी फलकांची तोडफोड केली. स्थानिक नागरिकांनी ही घटना पाहून तातडीने पोलिसांना कळवले. पोलिसांच्या त्वरित हस्तक्षेपामुळे परिस्थिती नियंत्रणात आली. या तोडफोडीमुळे आघाडीने विरोधकांवर जोरदार टीका केली आहे. मात्र विरोधक कोण हे त्यांनी स्पष्ट केले नाही. याप्रकरणी नालासोपारा पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या तपासणीनंतर आरोपींना पकडले जाईल, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

# ऑनलाइन फसवणुकीचे पाच लाख केले परत

## तक्रारदाराने मानले पोलिसांचे आभार

**। मीरा रोड** : काशिमीरा परिसरात राहणाऱ्या व्यक्तीला शेअर मार्केट ॲपमध्ये ऑनलाइन गुंतवणूक करण्यास सांगून ५ लाखांची फसवणूक करण्यात आली होती. काशीगाव पोलिसांनी तपास करून फसवणूक करण्यात आलेले ५ लाख रुपये तक्रारदाराला परत मिळवून दिले आहेत.

मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील काशिमीरा परिसरातील पप्पू प्रेमचंद्र झा यांना शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास अधिक नफा मिळवण्याचे आमिष दाखवून आर्थिक फसवणूक केली होती. या फसवणुकीच्या अनुषंगाने काशिमीरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याची दखल घेऊन तक्रारदाराच्या झालेल्या व्यवहाराबाबत माहिती प्राप्त करण्यात आली. मिळालेल्या माहितीचे अवलोकन केले असता, तक्रारदाराची रक्कम वेगवेगळ्या बँक खात्यात वळती झाल्याचे दिसले. त्यानुसार तक्रारदाराची रक्कम गोठवण्याबाबत संबंधित बँकेसोबत पत्रव्यवहार करून संशयित खात्यात रक्कम गोठवण्यात आली. त्यानंतर न्यायालयाकडून तक्रारदाराची रक्कम परत मिळवण्यासाठी काशिगाव पोलीस ठाण्याचे अधिकारी, अंमलदार यांनी वेळोवेळी पाठपुरावा करून तक्रारदाराची फसवणूक झालेली संपूर्ण रक्कम ५ लाखाच्या खात्यावर परत मिळवून देण्यात आले आहेत.



पुण्यनगरी पु.पा.४.

# शांततेला बाधा आणल्यास गुन्हा दाखल करू

## सोशल मीडियावर पोलिसांची तंबी

**। वसई :** सामाजिक, जाती, धार्मिक तेढ निर्माण करणारे आक्षेपार्ह पोस्ट/मेसेजमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊन सार्वजनिक शांततेस बाधा आल्यास कार्यवाही करण्यात येईल, अशी तंबी पोलिसांनी सोशल मीडिया आणि त्यांच्या अ‍ॅडमिनला दिली आहे.

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने फेसबुक, व्हॉट्सअ‍ॅप, ट्विटर वगैरे सोशल मीडियाच्या माध्यमातून राजकीय, सामाजिक, जातीय, धार्मिक विषयांवरून तेढ निर्माण करणाऱ्या पोस्ट व्हायरल होत आहेत. त्यातून सामाजिक तेढ निर्माण होण्याचा धोका आहे.

यामुळे कोणत्याही माध्यमाद्वारे दोन गटांमध्ये सामाजिक, जातीय, धार्मिक तेढ निर्माण करणारे आक्षेपार्ह संदेश तयार करून फॉरवर्ड करणे, सामाजिक स्वास्थ्य बिघडेल असे कृत्य करणे, प्रत्यक्ष धर्म, जात, पंथ याबाबत प्रक्षोभक वक्तव्य करणाऱ्या पोस्ट करू नयेत. तसे केल्यास तुमच्याविरुद्ध प्रचलित कायद्यातील तरतुदीनुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. या संबंधाने होणाऱ्या कारवाईत नोटीस कोर्टात आपल्याविरुद्ध कायदेशीर पुरावा म्हणून सादर करण्यात येईल, याची नोंद घ्यावी, अशी नोटीस मीरा-भाईंदर वसई-विरार पोलिसांनी बजावून सोशल मीडियाला तंबी दिली आहे.

पुण्यनगरी पु.पा.१.

# फ्लॅटचे प्रलोभन दाखवून फसवणूक, गुन्हा दाखल

**। वसई :** फ्लॅट देण्याच्या नावाखाली कांदिवली येथील ज्येष्ठ नागरिकाकडून ४ लाख रुपये लुबाडण्यात आल्याची घटना नालासोपारा पूर्वेला घडली आहे. कांदिवली-चारकोप येथे राहणारे नंदकिशोर तावडे (६२) हे नवीन फ्लॅटच्या शोधात होते. त्यांनी नालासोपाऱ्यातील नातेवाईक सुभाष तावडे यांच्या ओळखीने साई प्रणाली बिल्डर्स अ‍ॅण्ड डेव्हलपर्सतर्फे प्रतीक बारोट यांच्याशी संपर्क साधला.

त्यावेळी देवशेतपाडा येथील रमा निवासमधील एक सदनिका ६ लाख ६० हजारांना विकण्याचा व्यवहार करण्यात आला. नंतर त्यातील ११ हजार रोख आणि ३ लाख ८९ हजार रुपयांचा चेक, असे ४ लाख रुपयेही तावडे यांनी बारोट यांना दिले. उर्वरित २ लाख ६० हजार रुपये घराचा ताबा मिळाल्यावर देण्याचे ठरले.

मात्र, बारोटने गेल्या पाच वर्षांपासून तावडे यांना घरही दिले नाही आणि त्यांचे पैसेही परत केले नाही. यामुळे तावडे यांनी पैशाचा तगादा लावल्यावर बारोटने त्यांना शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली. त्यामुळे भयभित झालेल्या तावडे यांनी तुळींज पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार केली. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

Scanned with OKEN Scanner

नवभारत पु.पा.१.

# मीरा रोड में गरजे यूपी के CM योगी

## भरी हिंदुत्व की हुंकार, बंटेंगे तो कटेंगे की फिर ललकार, कांग्रेस ने फैलाया आतंकवाद-नक्सलवाद



■ **मुंबई,** नवभारत न्यूज नेटवर्क. उत्तर प्रदेश के मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ ने बुधवार को मीरा रोड में महायुति की चुनावी सभा में कांग्रेस प्रणित महाविकास आघाड़ी पर जमकर हमला बोला. उन्होंने हिंदुत्व की हुंकार भरी और फिर बंटेंगे तो कटेंगे के नारे को दोहराया. उन्होंने महाविकास आघाड़ी को अनैतिक अनाड़ी गठबंधन करार देते हुए कहा कि कांग्रेस ने देश में बंटवारे की राजनीति की. आतंकवाद और नक्सलवाद जैसे नासूर पैदा किए. मीरा रोड पूर्व के एस. के. स्टोन के सेंट्रल पार्क ग्राउंड में आयोजित जनसभा में योगी विरोधियों पर जमकर बरसे. उन्होंने कहा कि कांग्रेस ने धर्म के नाम पर पहले देश को बांटा, उसके बाद प्रांत और जाति-पाति में देश की जनता को बांटा. आतंकवाद और नक्सलवाद जैसे नासूर पैदा किया. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी के नेतृत्व में पिछले 10 वर्षों में देश बदल रहा है. देश विकास कर रहा है. देश की सीमाएं अब सुरक्षित हैं. पहले बंटे तो कटे, बंटेंगे तो फिर कटेंगे, इसलिए अब बंटना नहीं है. उन्होंने कहा कि कांग्रेस के एजेंडे में बेरोजगारी, गरीबी, महिलाएं आदि कभी थे ही नहीं. अपने 65 वर्षों के लंबे कार्यकाल में कांग्रेस राम मंदिर का मुद्दा हल नहीं कर सकी.

### कोई हमें छेड़ता है तो छोड़ते नहीं

कांग्रेस चाहती तो 500 वर्षों के विवाद को 1947 में देश के आजादी के बाद ही खत्म कर सकती थी, लेकिन राम मंदिर भी उनके एजेंडे में नहीं था. योगी ने महाविकास आघाड़ी पर तंज कसते हुए कहा कि राज्य में एक अनैतिक अनाड़ी गठबंधन चुनावी मैदान में है.

यह चुनाव मात्र चुनाव नहीं है. राष्ट्र की अस्मिता और अस्तित्व को वैश्विक मंच पर पुनर्स्थापित करने के प्रधानमंत्री मोदी के अभियान के लिए जनता से अपील करने आया हूं. हमने बदलते हुए भारत को देखा है.

अब भारत अपने देश की सीमा की सुरक्षा करना जानता है. वर्ष 2014 के पहले के भारत में पाकिस्तान घुसपैठ करता था. आतंकी वारदात को अंजाम देता था. कांग्रेस सरकार कहती थी, बोलिए मत पाकिस्तान से संबंध खराब हो जाएंगे.

आज हम किसी को छेड़ते नहीं और कोई हमें छेड़ता है तो हम छोड़ते भी नहीं हैं. इस अवसर पर कृपाशंकर सिंह, अमरजीत मिश्र, लल्लन तिवारी, एड. रवि व्यास, विक्रम प्रताप सिंह, शैलेश पांडे, राजू भोईर सहित बड़ी संख्या में महायुति के नेता उपस्थित थे.

## सुर्खियों में 'बंटेंगे तो कटेंगे' टी-शर्ट



योगी ने 'बंटेंगे तो कटेंगे' का नारा बुलंद किया है, लेकिन विरोधियों ने इस पर महायुति की आलोचना की है. महायुति सरकार में शामिल एनसीपी (एपी) के मुखिया व उपमुख्यमंत्री अजीत पवार भी इससे सहमत नहीं हैं, फिर भी योगी का नारा छाया हुआ है. योगी की चुनावी सभा में 'बंटेंगे तो कटेंगे' स्लोगन लिखी टी-शर्ट पहने एक युवक नजर आया. टी शर्ट के पिछले हिस्से में पीएम मोदी का नारा एक रहेंगे तो सेफ रहेंगे लिखा हुआ था. इस टी-शर्ट को लेकर काफी चर्चा है.

**शिवाजी पार्क में आज गरजेंगे मोदी :** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी गुरुवार (14 नवंबर) को एक बार फिर महाराष्ट्र के दौरे पर आ रहे हैं. इस दौरान वे संभाजी नगर में एक और मुंबई एमएमआर में दो सभाओं को संबोधित करेंगे. पीएम मोदी दोपहर में 1 बजे संभाजीनगर में रहेंगे. इसके उपरांत दोपहर 4 बजे खारघर के सेंट्रल पार्क में और शाम 6 बजे मुंबई में दादर स्थित शिवतीर्थ (शिवाजी पार्क मैदान) पर सभा करेंगे. पीएम मोदी की सभा के लिए ट्रैफिक में व्यापक फेरबदल किया गया है.

### टीपू सुल्तान चौक का बदलेंगे नाम

मीरा- भायंदर विधानसभा सीट से महायुति के प्रत्याशी नरेंद्र मेहता ने कहा कि योगी जहां-जहां जाते हैं, वहां का माहौल हिंदूमय हो जाता है. मैंने मीरा - भायंदर शहर के विकास का संकल्प लिया है. शहर में स्वास्थ्य, शिक्षा, नौकरी, कॉलेज, अच्छे अस्पताल बनवाने, शहर की सुरक्षा, व्यापारियों की सुरक्षा का संकल्प लिया है. हम शहर के प्रति वफादार रहेंगे. टीपू सुल्तान चौक का नाम बदल कर छत्रपति शिवाजी महाराज चौक करूंगा.

### यूपी में बन रहा महाराष्ट्र भवन

ओवला-माजीवाडा विधानसभा सीट से महायुति के उम्मीदवार प्रताप सरनाईक ने कहा कि यूपी के सीएम योगी के पहली बार मीरा-भायंदर की पावन धरती पर आगमन हुआ है, हमें इस बात का गर्व है. यह शहर मिनी इंडिया है. यहां सभी धर्म, जाति,प्रांत के लोग मिलजुल कर रहते हैं. उत्तर भारतीयों सहयोग से मैं तीन बार लगातार विधायक बना. मैंने डॉ. हरिवंशराय बच्चन उत्तर भारतीय भवन का निर्माण किया. योगी ने यूपी में महाराष्ट्र भवन बनाने की जगह हमें दी, जिसका निर्माण कार्य भी शुरू हो गया है. हम सब मिलकर अपने शहर और देश का विकास करेंगे.

Scanned with OKEN Scanner

नवभारत पु. ५१.३.

# नायगांव में रवि किशन ने किया रोड शो

## प्रचार के दौरान महायुति के लिए मांगे वोट, कहा 'बंटेंगे तो कटेंगे'



■ **नायगांव,** (सं). महाराष्ट्र विधानसभा चुनाव के लिए प्रचार तेज हो गया है और इसी कड़ी में मंगलवार की रात वसई में गोरखपुर से आये अभिनेता व सांसद रवि किशन ने रोड शो आयोजित किया. वह भारतीय जनता पार्टी (बीजेपी) के वसई और नालासोपारा विधानसभा सीटों के प्रत्याशी स्नेहा दुबे पंडित और राजन नाइक के समर्थन में प्रचार करने पहुंचे थे. रवि किशन ने अपनी रैली की शुरुआत वसई पूर्व के चिंचोटी नाका स्थित क्रांतिकारी वीर बिरसा मुंडा की मूर्ति पर माल्यार्पण करके की. इसलिए दौरान उन्होंने महाराष्ट्र की महायुति सरकार की उपलब्धियों का उल्लेख करते हुए मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस और अजीत पवार की तारीफ की. उन्होंने कहा कि ‘लाड़की बहन योजना’ और किसानों के लिए कई बेहतरीन योजनाओं के चलते महाराष्ट्र की जनता महायुति सरकार का समर्थन कर रही है. साथ ही कहा कि ‘हिंदुस्तान में हिंदुओं को जातियों में बांटने की कोशिश हुई, लेकिन प्रधानमंत्री का संदेश है कि एक रहोगे तो सेफ रहोगे. उन्होंने कहा कि यदि समाज बंटेगा तो कमजोर हो जाएगा और असुरक्षित रहेगा, इसलिए उन्होंने लोगों को एकजुट रहने का संदेश देते हुए कहा कि बंटेंगे तो कटेंगे.

N.B.T. 4

# समाज के नाम पर बांट रही कांग्रेसः योगी

■ **अमित तिवारी, मीरा-भाईदरः** उत्तर प्रदेश के मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ ने बुधवार को मीरा-भाईदर में चुनावी जनसभा को संबोधित किया। उन्होंने मीरा-भाईदर से बीजेपी उम्मीदवार नरेंद्र मेहता और ओवला-माजीवाडा से शिंदे सेना उम्मीदवार प्रताप सरनाईक को विजयी बनाने की अपील की। इसके अलावा उन्होंने उल्हासनगर के बीजेपी उम्मीदवार कुमार आयलानी को भी जिताने की बात कही। योगी ने कहा कि जो काम कांग्रेस 65 सालों में नहीं कर पाई, वो बीजेपी ने 15 सालों में कर दिखाया है। कांग्रेस ने पहले धर्म के नाम पर देश को बांटा, अब वे जाति के नाम पर समाज को बांट रहे हैं। उन्होंने कहा कि यह चुनाव देश को समृद्ध और सुरक्षित राष्ट्र बनाने का चुनाव है। योगी ने कहा कि धारा 370 को कांग्रेस की चार पीढ़ियां भी वापस नहीं ला पाएंगी।

**महायुति उम्मीदवारों के समर्थन में की सभा**

**उल्हासनगर की सभा हुई रद्दः** उल्हासनगर विधानसभा में भी योगी आदित्यनाथ की सभा होनी थी। लेकिन नागपुर की सभा और समय के अभाव के कारण उल्हासनगर की सभा को रद्द करना पड़ा। इसके अलावा नालासोपारा में भी सभा थी, लेकिन उसे भी रद्द कर दिया गया।


Scanned with OKEN Scanner

N.B.T. पा. नं. ४.

# देसी कच्ची शराब के लिए जंगलों में जल रही हैं भट्टियां!

- क्राइम ब्रांच ने वसई-विरार में कई ठिकानों पर मारा छापा
- नष्ट किया हजारों लीटर केमिकल

■ **निसं, वसई:** पुलिस आयुक्तालय के कई इलाकों में कच्ची शराब बनाए जाने की शिकायतें मिल रही है। नायगांव, नालासोपारा, विरार, अर्नाला, पेल्हार व अन्य भागों में शराब माफिया सक्रिय है। वसई-विरार के जंगलों में बड़े पैमाने पर कच्ची शराब की भट्टियां संचालित हो रही है। मंगलवार को क्राइम ब्रांच यूनिट 2 की टीम ने कामन स्थित देवकुंडी के जंगल में संचालित शराब भट्टियों पर छापा मारा और लाखों रुपये का रसायन नष्ट कर दिया। एक आरोपी के खिलाफ़ मामला दर्ज किया गया है। जानकारी के अनुसार, क्राइम ब्रांच यूनिट 2 की टीम को सूचना मिली थी कि कामन, देवकुंडी के जंगल में कच्ची शराब की भट्टी चलाई जा रही है। इस सूचना के बाद टीम ने वहां छापेमारी की। पांच हजार लीटर रसायन को नष्ट किया गया।






# प्राकृतिक नाले पर मिट्टी भराव, नागरिकों ने किया विरोध

■ **सुरेंद्र नेगी, नालासोपारा:** वसई-विरार में प्राकृतिक जलस्रोतों और नालों को नष्ट किए जाने के आरोप लगाए जा रहे है। नागरिकों ने आरोप लगाया कि जनप्रतिनिधियों द्वारा विकास कार्य तो शुरू नहीं किए गए है, बल्कि शहर के प्राकृतिक नालों और जलस्रोतों की अवैध भराई को रोक पाने में भी नाकाम साबित हो रहे है। मंगलवार को नालासोपारा पश्चिम के लिंक रोड से गुजरनेवाले एक प्राकृतिक नाले को जेसीबी की मदद से मिट्टी और मलबे से पाटे जाने का विरोध स्थानीय लोगों ने किया। लोगों के विरोध को देखते हुए मनपा का कर्मचारी बताकर मिट्टी पाटने वाले चले गए। मनपा से शिकायत की गई है, विभाग ने जांच कराने का आश्वासन दिया है।

बता दे कि नालासोपारा पश्चिम से विरार पश्चिम तक एक नए लिंक रोड का निर्माण दो साल पहले किया गया था। यह सड़क म्हाडा कॉलोनी से मनपा के नए मुख्यालय भवन तक जाती है। इस सड़क के दोनों ओर प्राकृतिक नाले है। इन नालों के माध्यम से शहर से निकलनेवाले गंदे पानी की निकासी होती है। इससे इस क्षेत्र में जलभराव की समस्या नहीं होती। मंगलवार की दोपहर कुछ लोग जेसीबी की मदद से इस नाले के पास मिट्टी व मलबे का भराव कर रहे थे। उसी समय स्थानीय लोगों ने इसका विरोध किया।

**नालासोपारा के नालों को नष्ट किया जा रहा है**



## विरोध करने पर चले गए

मीरा भाईंदर-वसई विरार पुलिस आयुक्तालय के अधिकारी रोहन खाड़े और कांग्रेस नेता कैप्टन नीलेश पेंढारी ने बताया कि वे लोग वहा से गुजर रहे थे, तब इस प्राकृतिक नाले के पास की जगह पर मिट्टी का भराव किया जा रहा था। इस नाले की चौड़ाई को कम किया जा रहा था। जब उन्होंने मिट्टी का भराव करनेवालों से पूछा कि नाले में मिट्टी क्यों डाली जा रही है, तो उन्होंने बताया कि वो लोग मनपा के कर्मचारी है। कुछ देर बाद काम बंद कर जेसीबी लेकर सभी चले गए। कैप्टन नीलेश पेंढारी ने आरोप लगाते हुए कहा कि कुछ लोग मनपा के कर्मचारी बता कर इस नाले को खत्म करने की कोशिश कर रहे है। इस संबध में प्रभाग 'ए' (बोलिंज) के प्रभारी सहायक आयुक्त शशिकांत पाटील से पूछे जाने पर उन्होंने कहा कि मनपा की ओर से ऐसा कोई काम शुरू नहीं किया गया है। इस तरह नाले पर भरनी करना गलत है। मामले की जांच की जाएगी और दोषी पाए जाने वालों के खिलाफ कड़ी कार्रवाई की जाएगी।

The The Free Press Journal




# Adityanath goes hyperlocal with pan-India focus

## Uttar Pradesh CM campaigns for Mahayuti candidates in Mira Bhayandar, Ulhasnagar and Ovala-Majiwada

**Suresh Golani**
MIRA BHAYANDAR

Uttar Pradesh Chief Minister and BJP leader Yogi Adityanath launched a scathing attack on the Congress and its allies on Wednesday evening in Mira-Bhayandar. "Unlike the erstwhile Congress government, which desperately failed to counter terrorism in their more than 65-year-old regime, our government led by Prime Minister Narendra Modi not only thwarted infiltration attempts by Pakistan, but also kept the country secured by eliminating terrorism and naxalism," he said.

The BJP leader was addressing a public rally at the Central Park ground in Mira Road as part of the poll campaign for Mahayuti candidates Narendra Mehta, Pratap Sarnaik and Uttamchand Ailani from the Mira Bhayandar (145), Ovala-Majiwada and Ulhasnagar (141) assembly segments, respectively.

Adityanath added, "We abrogated Article 370 in Kashmir, and now the Congress wants to reinstate it, but as our PM has already said, neither the present leadership nor their future generations would be able to revoke it."

At the rally, he took credit for free food grains to over 80 crore people for the last four-and-a-half years, and building the Ayodhya temple in just two years after coming to power.

The charged leader reiterated the 'batenge to katenge (if divided, we perish) and 'ek hain to safe hain' (if we are united, we are safe) war cry coined by him as he appealed voters to bring the Mahayuti alliance back to power with a thumping majority on the sacred soil of Maharashtra.

Highlighting various public-oriented schemes launched by the state and central governments aimed at genuine development with a focus on improving the lives of the common man, he accused the Congress of causing a huge damage to the country by playing divisive politics aimed at garnering votes.

He further said that the welfare and upliftment of poor people, women and youth has never been on the agenda of the Congress which has always misused power for personal gains.